



# हक्क पुस्तकांचा हक्क आनंदाचा

**अरविंद गुप्ता यांची मुलाखत**



बालसाहित्यावरच्या या अंकात अरविंद गुप्तांची मुलाखत कशासाठी? ते काही रूढ अर्थानं बालसाहित्याचे लेखक म्हणून ओळखले जात नाहीत. अरविंद गुप्तांना 'बालकारणी जनवैज्ञानिक' म्हणता येईल. लहान मुलांना विज्ञानाची आवड लावण्यासाठी ते जे कायकाय करत असतात, त्या सगळ्याचं वर्णन काही या नावात येत नाही, हे आधीच सांगायला हवं. आजूबाजूच्या साध्या साहित्यामधून, ते जादूई म्हणावीत अशी खेळणी तयार करून दाखवतात. एवढ्यावर थांबत नाहीत. ती सर्जकता लहानमोठ्यांपर्यंत पोचवण्यासाठी अविश्रांत प्रयत्न करतात. ते वैज्ञानिक तत्त्वं शिकवत नाहीत, त्यांचा सहजगत्या वापर करायला शिकवतात. त्यांना भेटलेली, त्यांच्या कार्यशाळांना आलेली माणसं त्यांच्या व्यक्तिमत्त्वानं भारून गेलेली असतात. हे गेली अनेक वर्ष आम्ही अनुभवत आलेलो आहोत. केवळ महाराष्ट्रातच नव्हे तर देशभरातही सान-थोरांच्या मनांवर त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचं, त्यांच्या कामांचं गारुड आहे. चलाख , हिशोबी माणसांनी या माणसापासून चार हात दूरच राहावं. हा जगावेगळा माणूस एखाद्या भेटीतही आपल्या -आम्ही बिघडलो तुम्ही बिघडाना- पद्धतीनं आपल्याला बदलवून टाकू शकेल. अरविंदजी हे अतिशय प्रेमळ मनमोकळं व्यक्तिमत्त्व आहे. त्यांच्याबद्दल अनेकदा पालकनीतीत आपण वाचलेलं असेल. तरीही त्यांच्याबद्दल आणखी सांगण्याजोगं उरतंच. त्यांचं वाचन फार दांडगं आहे. ते प्रचंड वाचतात. गेल्या तीस-पस्तीस वर्षांत त्यांनी अक्षरश: हजारो पुस्तकं वाचली आहेत. मानवी मूल्यांचा आदर करणारी, प्रेरणा देणारी, मुला-मोठ्यांना निखळ आनंद देणारी, विचार करायला लावणारी अशी अनेकानेक पुस्तकं! आपल्यापैकीही अनेकांना अशी वाचनाची आवड असेल, पण गुप्तांचं वैशिष्ट्य असं की ते फक्त स्वत: वाचून थांबत नाहीत. ही पुस्तकं इतरांनीही वाचावीत म्हणून जिवापाड प्रयत्न करतात. आज www.arvindguptatoys.com या त्यांच्या वेब-साईटवर जगभरातल्या अनेक भाषांमधून अनेक देशांतून, अनेक प्रकाशकांकडून गोळा केलेली, भाषांतरित करून घेतलेली, नवीन तयार केलेली हजारो पुस्तकं सर्वांसाठी विनामूल्य उपलब्ध केलेली आहेत. मुलांसाठी बनवलेल्या शेकडो कल्पनातीत सुंदर चित्रफिती आहेत.

यातल्या बहुतेक चित्रफिती विज्ञान-खेळण्यांबद्दलच्या आहेत. पुस्तकं मात्र वेगवेगळ्या विषयांवरची - पर्यावरण, शिक्षण, शांती, न्याय-समानतावादी, शोषणविरोधी, चरित्रं - आणि सर्वात महत्त्वाचं म्हणजे कथारूपातलीही आहेत.

एखादं चांगलं पुस्तक कुठे सापडलं की त्याच्या छायाप्रती करून, कधीकधी चक्क छापून घेऊनसुद्धा ते लोकांना वाटायचं हा त्यांचा छंदच आहे. पुस्तकं सर्वांना सहज उपलब्ध झाली पाहिजेत ही त्यामागची कल्पना आहे, अगदी स्पष्ट कल्पना आहे. बाजारात, जुन्या बाजारातसुद्धा उपलब्ध नसलेली पुस्तकं, शक्य झालं तिथं परवानग्या मिळवून त्यांनी पुन्हा छापली, आवश्यक तिथं भाषांतरं करवली. कॉपीराईट आणि पेटंटच्या जमान्यात आपण जगावेगळं काही वागतोय, याची जणू जाणीवच नसल्यासारखे ते म्हणतात, ''आज ते काम काहीसं सोपं झालं आहे, पुस्तक स्कॅन करून साइटवर टाकलं की बस.''

गेली अनेक वर्षे आम्ही त्यांना ओळखतो, हा माणूस खेळणी बनवत, पुस्तकं वाचत वेगळंच जगतो आहे; जगभरच्या उत्तमोत्तम देखण्या पुस्तकांचं सहज वाटप करतो आहे. त्याचं कारण, अरविंद गुप्तांकडे नुसतं पाहून आपल्याला कळतं, पण एकदा त्यांनाच प्रश्न विचारूनही समजावून घ्यावं, आणि मुख्य म्हणजे पालकनीतीच्या वाचकांना बालसाहित्यावरच्या या अंकाच्या निमित्तानं सांगावं, म्हणून आम्ही अरविंद गुप्तांना भेटायला त्यांच्या गुहेत - आयुकातल्या मुक्तांगणात गेलो होतो. त्यांच्या गुहेतच होतो त्यामुळे स्वाभाविकपणे आसपास असंख्य खेळणी होती. भिंतीवर लावलेली, टांगलेली, भिरभिरणारी. त्यांचे दोन सहकारी शेजारी खेळणी करत बसले होते. ते स्वत: जे. पी. नाईकांचं एक पुस्तक स्कॅन करत होते. जे. पी. नाईकांच्या एकूण लेखनापैकी बासष्ट पुस्तकं ( ज्याचं वर्णन 'अत्यंत मौलिक असा शैक्षणिक ठेवा' असं त्यांनी केलं.) सर्वांना उपलब्ध व्हावीत म्हणून हे काम सुरू होतं.

**अरविंदजी, पुस्तकांचा हा असा संग्रह करायला आणि वितरण करायला सुरुवात केव्हा झाली ?**

तीसेक वर्षं झाली या गोष्टीला, मी तेव्हा नुकताच पुण्यात आलो होतो. 'गेल ऑम्वेट' ही माझी मैत्रीण तेव्हा पुण्यात होती. ती फुले-आंबेडकर यांच्यावर संशोधन करत होती. सहा आंतरराष्ट्रीय जर्नल्समध्ये ती लिहायची. तिच्याकडे फार सुंदर पुस्तकं होती. स्त्रीवादी, पर्यावरणवादी, शांततावादी-युद्धविरोधी. फार सुंदर. मी ती वाचायचो, तेव्हा मला वाटलं की सर्वांनीच ती वाचावीत. म्हणून मग मी काही पुस्तकांच्या छायाप्रती करून घेतल्या. हे काम स्वस्तात व्हावं म्हणून लहान आकाराचा कागद वापरला. माझ्याकडे तेव्हा अनेक पुस्तकांच्या अशा प्रती नेहमी असायच्या. अशी दीडशे पुस्तकं मी जमवली होती. त्यांची यादीही करून ठेवली होती. ही यादी मी अनेकांना पाठवायचो. त्यांना त्यातली जी पुस्तकं हवी असतील, ती झेरॉक्सच्या खर्चात पाठवून द्यायचो. एका पुस्तकाला साधारण चाळीसेक रुपये पडायचे. खर्च वाचवायला मी कागदाची रिमं घरी आणून, कापून ठेवायचो.


पण आता असं काही करावं लागत नाही. आता कोणी पुस्तक घ्यायला आलं, की मी म्हणतो, ''कशाला घेता पुस्तक विकत, कागद कशाला वाया घालवता- कॉम्प्युटरवरच वाचा''. इथं आयुकात ब्रॉडबॅण्ड उपलब्ध असल्यानं पुस्तकं नेटवर टाकायला सोपं झालंय. गेल्या १०-१२ वर्षांत चार हजार पुस्तकं टाकली आहेत मी नेटवर!

**मुलांसाठी पुस्तकं केव्हापासून जमवता आहात ?**

सुरवात झाली ती दुलारीच्या म्हणजे माझ्या मुलीच्या निमित्तानं. दुलारी लहान असताना आम्ही दिल्लीत होतो. तिची शाळा सुटली की नंतरचा वेळ आम्ही दोघं एकत्र असायचो. मी शाळांमध्ये विज्ञान-खेळण्यांच्या कार्यशाळा घेत असे, जवळजवळ रोज एक. ते झालं की उरलेला वेळ आम्ही पुस्तकं वाचत बसायचो.

दिल्लीतला 'कबाडी बाजार' फार छान होता. मला अजूनही त्याची फार आठवण येते. एक किलोमीटरभर लांब बाजार भरायचा दरियागंजमध्ये. मी आणि दुलारी तिथं पुस्तकं धुंडाळत फिरायचो. त्या रस्त्यावर असं भरपूर 'शिक्षण' उपलब्ध असायचं. आपण वाचत गेलो की आपल्याला कळायला लागतं, 'न्यूबरी' नावाचा शिक्का असलेली अमेरिकन पुस्तकं फार चांगली असतात. दरवर्षी अमेरिकेतल्या लायब्ररी असोसिएशनतर्फे सर्वोत्कृष्ट बालसाहित्यासाठी 'न्यूबरी' नावाचा एक पुरस्कारच दिला जातो. १९२२ पासून हा पुरस्कार दिला जातोय. जॉन न्यूबरी नावाचा मुलांच्या पुस्तकांचा प्रकाशक होता, त्याच्या नावाचा हा पुरस्कार आहे. या पुरस्कारासाठी फार प्रयत्नपूर्वक पुस्तक निवडलं जातं. ह्यात व्यापारी संस्था सहभागी नसल्यानं ही निवड फार चांगली असते. अशी बरीच पुस्तकं मला या जुन्या बाजारात मिळाली. न्यूबरी पुरस्कारप्राप्त पुस्तकं खरोखरच सर्वोत्कृष्ट असतात. छानचित्रं असलेली, मुलांना वाचावीशी वाटतील अशी.






त्यातली बरीच ‘स्कोलॅस्टिक’ नावाच्या प्रकाशनाची होती.

दिल्लीतच दुसऱ्या एका ठिकाणी चांगल्या पुस्तकांचं घबाडच माझ्या हाती आलं. सेंट कोलंबस शाळेमध्ये मी एकदा विज्ञान-खेळणी- शिबिर घ्यायला गेलो होतो. तिथं तीनशे अभिजात वाङ्मयाची पुठ्ठा-बांधणीची सुंदर पुस्तकं मला मिळाली. आणखी एक ठिकाण, म्हणजे अमेरिकन इंटरनॅशनल एलिमेंटरी स्कूल. त्या शाळेच्या ग्रंथपाल, वंदना सेन म्हणून होत्या, त्यांचं पुस्तकांवर फार प्रेम. त्यांनी मला त्यांचं ग्रंथालय दाखवलं. उत्कृष्ट सुसज्ज ग्रंथालय, २६००० पुस्तकं! सांगायची गोष्ट, म्हणजे या बाईंनी सगळी पुस्तकं स्वत: वाचलेली होती! मुलांसाठी पूर्ण वेळ खुलं असणारं हे ग्रंथालय होतं. वेगवेगळ्या निमित्तानं त्या मुलांसाठी पुस्तकं काढून ठेवत. मुलांनी पुस्तकं वाचावीत-पहावीत यासाठी त्या शाळेत अनेक तऱ्हेचे प्रयत्न केले जात. शाळेतल्या मुलांसाठी असंच ग्रंथालय असायला हवं, शाळेचा आत्मा ग्रंथालयात असायला हवा. मीही पुस्तकप्रेमी असल्याचं त्यांना दिसल्यावर त्यांनी ते ग्रंथालय मला मोकळेपणानं उपलब्ध करून दिलं. तिथली पुस्तकं उत्कृष्टच होती. मात्र एक गोष्ट मला तिथे खटकली. त्यात एकही भारतीय लेखकाचं पुस्तक नव्हतं. मी पुढे भारत ज्ञान विज्ञान संमेलनासाठी जी शंभर पुस्तकं काढली, त्यातली चाळीस पुस्तकं मी इथूनच निवडली होती.

**तुम्ही लहानपणी काय काय वाचलं होतंत**
**तुमच्या घरातही खूप पुस्तकं होती का ?**

छे, छे ! मला लहानपणी अजिबात पुस्तकं वाचायला मिळाली नव्हती. माझे आई-वडील शिकलेले नव्हते. आईच्या माहेरी मात्र तिचे भाऊ वगैरे खूप शिकलेले होते. त्यामुळे आईला शिक्षणाचं महत्त्व कळलेलं होतं. माझी आई एक ‘दृष्टी’ असलेली बाई होती. तिनंच आग्रह करकरून आम्हाला शिकवलं. माझं लहानपण फार आनंदात गेलं. मनाच्या आतून उमलून यावा तसा मुक्त आनंद मी खूप उपभोगला. मुख्य म्हणजे आईनं खूप आत्मविश्वास दिला. ‘स्व’ची किंमत शिकवली. चार गोष्टी कमी असल्या, नसल्या, तरी चांगलं आयुष्य जगता येतं, हे तिनं नकळत शिकवलं. हे फार महत्त्वाचं असतं. सगळ्यांचा विरोध असताना माझ्या आईनं आम्हा भावंडांना शिकवलं. आम्ही राहात होतो तिथून जवळच एक मिशनरी शाळा होती. बरेलीमधली ती सर्वांत उत्तम शाळा, आईनं आम्हाला त्याच शाळेत घातलं. पण त्यामुळे एक झालं, आमच्या शिक्षणाला असलेल्या विरोधात धार्मिक कारणांचीही थोडी भर पडली. तेव्हा वाचनाची भूक तशी राहूनच गेली होती. लहानपणी मी एकच पुस्तक वाचल्याचं मला आठवतं. माझ्या मामाकडे गेलो असताना गोर्कीचं ‘मदर’ वाचलं होतं. खूप रडलो होतो ते वाचून.

**मग केव्हा वाचायला लागलात,**
**आणि कुठे मिळाली, पुस्तकं ?**

सतराव्या वर्षी मला जेव्हा आय. आय. टी., कानपूरमध्ये प्रवेश मिळाला तेव्हा. तिथे फार उत्तम ग्रंथालय होतं आणि सकाळी आठ ते रात्री बारापर्यंत ते उघडं असे. तोपर्यंत मला कधी साधं वर्तमानपत्रंही वाचायला मिळालेलं नव्हतं. इथं मात्र मी रोज सहा-सहा वर्तमानपत्रं वाचायचो. ई.पी.डब्ल्यू. वाचायची नुसती सवय काय, व्यसनच लागलं इथं मला! दहा दहा पुस्तकं एका वेळी नेता यायची. फार मस्त वातावरण होतं ते! अनेक आंतरराष्ट्रीय कीर्तीचे संशोधक तिथं येत. त्यांची भाषणं ऐकायला मिळत. गुन्नार मिर्डाल-नोबेल पुरस्कार विजेते- त्यांचं भाषण मी इथंच ऐकलं. त्या काळी, म्हणजे साधारण ७५ च्या आसपास, तिथं एका प्राध्यापकांनी फिल्म-क्लब सुरू केलेला होता. कुरोसावा, फेलिनी, सत्यजित राय अशा नामवंत दिग्दर्शकांचे अनेक चित्रपट तिथं मला पाहायला मिळाले.तोपर्यंत मी या साऱ्यापासून वंचित राहिलो होतो. त्यामुळं सगळं नुसतं आसासून घेत होतो.

**हे सारं दुलारीला मिळावं म्हणून प्रयत्न केलेत का ?**

दुलारी तर पुस्तकांच्या घरातच जन्माला आली. मी पुण्यात येऊन टेल्कोत नोकरी करायला लागलो, तेव्हापासून पुस्तकं गोळा करतच होतो. राहणं-जेवणं एवढ्या गोष्टी सोडल्या तर उरलेला सगळा पैसा पुस्तकावरच खर्च होई. पुण्यातल्या ब्रिटिश कौन्सिल लायब्ररीबद्दल मी फार ऐकून होतो. पुण्यात आल्याआल्या स्टेशनवरच सामान ठेवून आधी तिथं गेलो होतो. पण तिथं दोन वर्षं वेटिंग लिस्ट होती. पुढे तिथलं सभासदत्व मला मिळालं.

**एखादं पुस्तक चांगलं आहे हे ठरवायचं कसं**
**चांगल्या पुस्तकाची व्याख्या तुम्ही कशी कराल ?**

पुस्तकानं तुम्हाला प्रेरणा द्यायला हवी. हे फार महत्त्वाचं आहे. परमेश्वराची जशी व्याख्या करता येत नाही, कुणी करूच शकत नाही, तशी चांगल्या पुस्तकाचीही व्याख्या करता येत नाही. पण आपण वाचत गेलो की कळायला लागतं. आता मला वासावरूनसुद्धा समजतं चांगलं पुस्तक! आपल्याकडे ना, चांगल्या पुस्तकांचा फार अभाव आहे. बुद्धाचा आणि गांधींचा देश आपला...आणि पुस्तकं कसली मिळतात? तर मारा....कापा....फक्त वीररसच किंवा बीभत्स रस...कशी आतडी बाहेर काढली.... त्याचा मला फार त्रास होतो. शांततेबद्दलचं 'सदाको'सारखं पुस्तक आपल्याला बाहेरून आणावं लागतं! युद्धविरोधी पुस्तकं बाहेरून आणावी लागतात. साहित्य हा त्या त्या समाजात काय चाललंय, ह्याचा आरसा असतो. आपल्या इथे लिहिली जाणारी पुस्तकंही तेच दाखवतात.

संदीप पांडे यांनी अणुस्फोटांविरुद्ध पोखरणपासून एक शांतीयात्रा काढली होती. तिथं 'सदाको'ची एक हजार पुस्तकं विकली गेली होती. त्यांनी आणखी चार शांततावादी पुस्तकं मला पाठवली- 'फेथफुल एलिफंट', 'फायर ऑफ हिरोशिमा', 'तिनची तिचाकी...' अशी. युद्धाचा मुला-माणसांवर, प्राण्यांवर काय परिणाम होतो, त्याचं चित्रण आहे त्यांत. ही चांगली पुस्तकं! आणखी एक सुंदर पुस्तक म्हणजे 'दानी पेड.'

पर्यावरण, युद्धविरोध, समानता, शांती याबद्दल सांगणारी पुस्तकं म्हणजे चांगली पुस्तकं. चांगली पुस्तकं कुठली तर मुलांना, मोठ्या माणसांना आपण होऊन उचलावीशी, वाचावीशी वाटतील अशी. आपल्याला कुठली पुस्तकं वाचायची आहेत ते मुलांनी स्वत:च ठरवायला हवं. कुणीतरी मोठ्या माणसानं, तो बी. एड्. झालाय किंवा पी. एच्. डी. झालाय म्हणून मुलांसाठी पुस्तकं निवडायचीच नाहीत. मला तो उद्दामपणाच वाटतो. मुलांनी आपली पुस्तकं आपणच निवडायला हवीत.

**मुळातच मुलांनी पुस्तकं वाचायला का हवीत**
**तुम्हाला काय वाटतं ?**

पुस्तकांना आयुष्यात काही पर्यायच नाही असं मला वाटतं. जगायला लागणारा सगळा चांगुलपणा, मूल्यं, पुस्तकांमुळेच कळतात. पुस्तकांचं जग म्हणजे एक जादुई दुनिया असते, एखाद्या स्वप्नासारखी; मुलं त्यातल्या पात्रांशी एकरूप होतात. त्या गोष्टींमधली मजा, आनंद याबरोबरच अनेक गोष्टी मुलं पुस्तकं वाचण्यातून नकळत शिकतात. आजचं आजूबाजूचं वातावरण स्पर्धा, द्वेष आणि वाईटानं इतकं भरलंय, की त्यात चांगलं तगून राहायचं, तर मुलांसाठी चांगली पुस्तकं देणं फार गरजेचं आहे.

**पण तुम्हाला हे काम का करावंसं वाटलं ?**

पुस्तकं ही माझ्यासाठी जगण्याची प्रेरणा आहे, माझी ती आंतरिक गरज आहे. मी म्हटलं तसं मला पुस्तकं आयुष्यात बरीच उशिरा वाचायला मिळाली. तशी वाट मुलांना बघायला लागू नये, असं मला तेव्हा वाटलं असावं. दुसरं म्हणजे 'मीच का करायचं?' या प्रश्नाचं उत्तर 'मी का नाही करायचं?' असंही देता येतं. मला माहीत नाही, पण कदाचित लहानपण आनंदी गेल्यामुळे, आपल्या मनात एक निर्मळ भाव असतो. चांगुलपणाचा झरा वाहता असतो. त्यातून आपण चांगलं असं काही करावं, असं माणसाला वाटतं.

**भारत ज्ञानविज्ञान जथ्यासाठी तुम्ही भरपूर छोटी पुस्तकं**
**निवडलीत, तयार केलीत. इकडे कसे वळलात! ?**




मी केरळमध्ये लॉरी बेकरबरोबर काम करत होतो. लॉरी बेकर या एकाच आर्किटेक्टनं 'गरीब लोकांसाठी घरं' या विषयावर काम केलं आहे, म्हणून मला त्यांच्याबरोबर काम करायचं होतं. तिथं 'केरळ शास्त्र साहित्य परिषदे'चे कृष्णकुमार भेटले. त्यांनी त्यावेळी चार

पुस्तकं तयार केली होती. ती मला अजिबात आवडली नाहीत. म्हणून चांगली पुस्तकं तयार करण्यासाठी  म्हणून मी त्यांच्याबरोबर काम करायला लागलो. पहिल्या प्रथम 'द मॅन हू प्लँटेड ट्रीज' तयार केलं. पुढे एकेक करत एकूण शंभर पुस्तकं तयार झाली.

**एवढी शंभर पुस्तकं, त्यांची भाषांतरं करणारे लोक तुम्हाला कसे काय मिळाले? केवढं मोठं काम आहे हे !**

माझ्या मित्राकडे- विनोद रैनाकडे- त्याच्यासाठी पैसे मागितले. रोज भाषांतरं करायची, चित्रं काढून घ्यायची, असं काम चालू केलं. अगदी कमी मोबदल्यावरही मित्रांनी ही कामं केली. मी स्वत: कितीतरी भाषांतरं केली. आम्ही मन घातलं त्यात, ते स्वप्न जगतच होतो रोज. आपल्याला रोज रात्री झोपताना मनाशी म्हणता आलं पाहिजे 'आज आपण काही भलं काम केलेलं आहे'.

सुरुवात करताना कुठलंही काम लहानच असतं. मला चांगलं पुस्तक दिसलं, की मी ते इतरांना मिळावं म्हणून धडपडत असतो. छायाप्रती करून घे, स्वत:च भाषांतर कर. कितीतरी पुस्तकांची मी भाषांतरं केलेली आहेत. मग कधी कोणी भेटायला येई, त्यांना मी भाषांतर करायला, चित्रं काढायला सांगत असे. नेहमीच कुणी ना कुणी भेटायचं. 'तोत्तोचान' पुस्तक सापडलं, तेव्हा पूर्वा कुशवाहा भेटली. तिनं ते हिंदीमध्ये केलं. तिची मुलगी तेव्हा लहान होती. रोज केलेलं भाषांतर ती मुलीला वाचून दाखवायची. पूर्वा म्हणाली होती: ते पाच-सहा महिने एखाद्या स्वप्नासारखे उडून गेले आनंदात! 'तोत्तोचान' मराठीत करणारी चेतना सरदेशमुख तर तेव्हा शिकतच होती. 'रानवारा'त तिच्या भाषांतराची लेखमाला छापली होती.

अजूनही इथं भेटायला येणारे कितीतरी लोक काही ना काही मदत करतात; सुजाता गोडबोले, विनीता गनबोटे, आणखी कितीतरी. त्यांनी भाषांतरं केल्यामुळे असिमोव्हची अकरा पुस्तकं मराठीत उपलब्ध आहेत. इतकी दुसऱ्या कुठल्याही भाषेत नाहीत.

**पुस्तकांची भाषांतरं करायला लेखक-प्रकाशकांची परवानगी लागते, ती मिळते का?**

पूर्वी परवानगी मिळवणं फार कटकटीचं असे. पत्रं लिहा, उत्तराची वाट बघा. मी लिहित असे ती पत्रं. पण आता इमेल करणं, त्यामानानं जास्त सोपं पडतं. समरहिलच्या पुस्तकाचं भाषांतर करण्यासाठी लेखकाच्या मुलीला मी वीस पत्रं लिहिली. पहिल्याच पत्राच्या उत्तरात तिनं म्हटलं होतं, 'जगभरातल्या शिक्षकांपर्यंत माझ्या वडिलांचे विचार पोचावेत असं मला वाटतं.' याचा अर्थ तिला त्यात रस होता. मग म्हटलं, आता वेळ लागला तरी हरकत नाही. शेवटी हिंदीमध्ये पुस्तक छापायचे हक्क तिनं मला देऊन टाकले. माझ्या कल्पना स्पष्ट आहेत. मला काही त्यातून पैसा नकोय, फायदा नकोय. माझ्या देशातल्या मुलांसाठी मला हे साहित्य उपलब्ध करून द्यायचं आहे. माझा असा त्यात दुसरा काही स्वार्थ नाही.  या गरीब देशात कॉपीराइटसारख्या कालबाह्य गोष्टी आपण लाथाडूनच द्यायला हव्यात. आपल्या अवतीभोवती ही लाखो मुलं आहेत, ती या देशाचं भवितव्य आहेत, त्यांना ते साहित्य मिळायलाच हवं. तसं न करता आपण जर भूतकाळाला धरून बसलो तर कसं व्हायचं?  भविष्यकाळाचाच त्या साहित्यावर खरा हक्क आहे, असं मला वाटतं.

मुलामुलींसाठी चांगली पुस्तकं, चांगली खेळणी, चांगलं साहित्य उपलब्ध नसेल तर केवढं मोठं नुकसान होईल! आधीच इतके अमाप प्रश्न मानव जातीनं निर्माण करून ठेवलेत, पर्यावरणनाश, युद्धखोरी...त्याबद्दल त्यांना निदान जाण तर हवी, ती कशी येईल? मानवी मूल्यं त्यांच्यापर्यंत कशी पोचतील? इथली माती इतकी ओसाड झाली आहे, की काही पेरलं तरी कदाचित काही उगवायचंही नाही. अशा परिस्थितीत इथं थोडं जरी शिक्षण रुजायचं असेल तर आपल्याला मोठी पूर्वतयारी करायला लागेल. आणि ती फक्त वाचनातूनच होऊ शकेल.

**पण आज काल 'वाचन' या गोष्टीला मागच्या बाकावर ढकलून दिलेलं आहे सर्वांनी. आजकाल प्रत्येकाला 'बघायचं' असतं, वाचायला कोणाला हवं असतं?**

खरं आहे. आणि ही मोठ्यांची चूक आहे. कुणी काय करायचं, काय पहायचं, काय वाचायचं हे मोठी माणसं ठरवतात. मुलांना निवडायची संधी द्या. त्यांना ठरवू दे काय हवं ते. तसंच, पाठ्यपुस्तकं निश्चित करून सगळ्यांनी ते एकच एक पुस्तक वाचणं, चुकीचंच आहे. गिजुभाई बधेकांच्या 'दिवास्वप्न'मध्ये एक उल्लेख आहे बघा. शिक्षक म्हणतो, ''अरे, तीन पुस्तकं प्रत्येकी वापरायची आहेत ना...तर मी प्रत्येकाला वेगळी तीन पुस्तकं देतो. सगळी मिळून वर्गाला दीडशे पुस्तकं



'सौरपुराण : ऊर्जा प्रकाशन'मधून साभार

उपलब्ध होतील. वाचू द्या सगळ्यांना नवनवीन पुस्तकं.'' मी जेव्हा शाळांमध्ये जायचो, तेव्हा मला दिसायचं की कोणत्या वर्गाला विज्ञान खेळणी दाखवायची हेही शाळाच ठरवायच्या. अरे, सर्वांना खेळू द्या ना. समजा, त्यातली काही मुलं पुढं कला-वाणिज्य-समाजशास्त्र शिकणार असतील, पण त्यांना खेळणी नकोत असं शाळेनं का ठरवावं? त्यामुळे मग मी एखाद्या शाळेत गेलो, की सगळ्या मुलांनी खेळणी पाहावीत असा आग्रह धरायचो. खेळण्याचा आनंद सर्वांना मिळायला हवा. तसाच वाचण्याचा आनंदही सर्वांना मिळायला हवा.

**पण कित्येक शाळांमध्ये तर वाचनालयं नसतात, वाचनाचे तासही नसतात. ?**


हो. जसं हल्ली वर्तमानपत्रं संपादकांशिवाय चालतात, तशा शाळाही वाचनालयांशिवाय चालवतात. जर शिक्षकांनीही भरपूर वाचलं नाही, चांगले शैक्षणिक अनुभव मिळवून वाचले नाहीत, तर त्यांना मोठीमोठी स्वप्नं कशी दिसतील? म्हणून त्यांना वाचायला मिळतंय ना हे पाहण्याचं काम आपलं आहे.

**मोठी-मोठी स्वप्नं म्हणजे तुम्हाला नेमकं काय म्हणायचंय ?**

हे फार सापेक्ष आहे. पण, मुलांना अगदी आनंदी बालपण मिळावं, त्यांना त्यांचे मार्ग ठरवण्याचं स्वातंत्र्य मिळावं, त्यांना वाचण्यासाठी भरपूर पुस्तकं 'पब्लिक डोमेन'मध्ये असावीत. 'पैसे नव्हते म्हणून अमूकतमूक चांगलं वाचू शकला नाही' अशी वेळ कोणावरही यायला नको. आपापल्या मातृभाषेत मुलांसाठी भरपूर साधनं उपलब्ध व्हावीत. जगामध्ये साहित्याचा फार मोठा खजिना आहे. त्यातलं अंशमात्र जरी आपल्या देशातल्या मुलांसाठी आपण त्यांच्या त्यांच्या भाषेत आणू शकलो, तरी पुष्कळ काम होईल. मग त्यातून काय वाचायचं, हे मुलांना आपापलं निवडू दे.

आपल्याकडे चांगलं काम करणारी, अत्यंत संवेदनशील, अशी पुष्कळ माणसं आहेत. त्यांची काही कमतरता नाही. मी माझ्या अनुभवाच्या जोरावर असं म्हणतो आहे. त्यांच्या मदतीनं मुलांना जीवनदायी अनुभव द्यायला हवेत.

**साहित्यावर सर्वांची मालकी असायला हवी असं जे तुम्ही म्हणताय, त्यामागची तुमची कल्पना सांगाल का? ?**




मी जेव्हा टेल्कोत काम करत होतो तेव्हा बघायचो, की ट्रक्स बनवणाऱ्या कामगारांना जेवढे पैसे मिळतात, त्यापेक्षा ऑफिसर्सना बरेच जास्त मिळतात. ट्रक बनवणाऱ्यांपेक्षा रस्ता बनवणाऱ्यांना फार कमी पैसे मिळतात. खरं तर रस्ते ट्रकपेक्षा जास्त महत्त्वाचे नाहीत का? मग असं का, असा विचार करताकरता मला अधिक मूलभूत प्रश्न पडू लागले- या समाजावर नियंत्रण कोणाचं? संसाधनांवर मालकी कोणाची? आणि का? मग या परिस्थितीत आपण काय करायला हवं? या प्रश्नांची आपलीआपली उत्तरंच आपल्याला शोधावी लागतात. ते शोधण्यासाठी मी वर्षभर रजा घेतली. त्या काळात काही दिवस किशोरभारती संस्थेत (होशंगाबाद जिल्ह्यात) विज्ञानशिक्षणासाठी स्थानिक साधनं तयार करण्याचं काम केलं. नंतर काही दिवस केरळमध्ये लॉरी बेकर यांच्याबरोबर स्वस्त घरं बनवण्याचं काम केलं. पण एवढ्यानंही भागणार नाही, यापेक्षा वेगळं काही करावं लागेल असं लक्षात आलं होतं. म्हणून १९८० मध्ये मी टेल्को सोडली आणि 'विदूषक कारखान्या'त सहभागी झालो. हा कारखाना म्हणजे आयआयटीतल्या काही संवेदनशील लोकांनी, शाहडोलच्या आदिवासी भागात चालू केलेलं एक कम्यून होतं. त्यात दुनु रॉय, सुधीन्द्र शेषाद्री, संजीव घोटगे वगैरे सहभागी होते. इथं आम्ही सर्व कामं वाटून घेऊन करायचो. स्वयंपाक करायचो, एक वर्कशॉप चालवायचो, डिझेल ट्रक आणि पंप दुरुस्त करायचो आणि मुख्य म्हणजे आम्हाला पडत असलेल्या अपरंपार प्रश्नांचं विश्लेषण आणि चर्चा करायचो. इथं 'Personal is Political' या न्यायानं मला माझ्या अनेक प्रश्नांची उत्तरं सापडू लागली.

१९८१ ते १९८३ दरम्यान मी छत्तीसगडमधल्या खाणकामगार संघटनेबरोबर काम केलं. या आधी 'शोषण, रोजंदारीवर किंवा ठेक्यानं काम करणं' हे माझ्यासाठी केवळ कागदावरचे शब्द होते. त्यांच्या अर्थाची मला काहीच जाण नव्हती. मला या वंचितांचं जगणं समजून घ्यायचं होतं, त्यांच्यासह जगायचं होतं. ही तीन वर्षं कष्टाची होती, पण मला फार श्रीमंत करून गेली.

संघटनेच्या कार्यालयात जमिनीवर झोपायचं, नुसता भात जेवायचा. मितान नावाची संघटनेची पत्रिका काढायची आणि खाणींच्या प्रवेशद्वाराशी ती विकायची. तिथं संघटनेच्या शाळेत मी शिकवायचो, गॅरेजमध्ये ट्रक दुरुस्तही करायचो. गरिबांच्या आयुष्याचा लढा मी इथं पुरेपूर अनुभवला. त्या सगळ्यातून मला आत खोल जाणवलं की मानवजातीच्या भल्यासाठी मानवाचं आजवरचं संचित प्रत्येकाला उपलब्ध असायलाच हवं. त्याच्यावर फक्त 'ज्यांना सापडलं त्यांचा हक्क' असावा, किंवा 'बनवणाऱ्याचीच मालकी' असावी हे योग्यच नाही.

आपल्या समाजातच नव्हे, तर जगात सर्वत्रच भयंकर विषमता आहे. आपल्या देशातल्या एवढ्या मोठ्या लोकसंख्येचं जिणं अत्यंत वाईट आहे. त्यातही लहान मुलांची अवस्था तर फारच वाईट आहे. हे सगळं बदलायचं असेल तर, व्यवस्था बदलायला हवी. पण पहिली मोडून दुसरी निर्माण करताना आयुष्यांमध्ये फार मोठी पोकळी तयार होते. मोडतोडीपेक्षा काही सकारात्मक घडवण्यापासून आपल्याला सुरुवात करता येईल. त्यासाठी हा सारा खटाटोप. मुलांसाठी म्हणाल तर त्यांना प्रसन्न, हसरं, आनंदी बालपण मिळायलाच हवं, चांगली पुस्तकं, चांगली खेळणी आणि चांगलं शिक्षणही!

■■■

- नीलिमा सहस्रबुद्धे, प्रियंवदा बारभाई


*Best Wishes From*

**CONCEPT ELECTRONIC ENGINEERING SOLUTIONS PVT. LTD.**

Plot No. 54, Chinmay, Mayur Colony,
Kothrud, Pune - 411 038, Maharashtra
PH : 020 2545 9232, 2545 9233
Mobile: 098500 47898 Email : sanjaypataskar@ceespl.com